# FORM G

## INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR

# 'V.G.I PHARMA PRIVATE LIMITED'

## OPERATING IN PHARMACEUTICAL MANUFACTURING IN AKOLA, MAHARASHTRA

*(Under sub-regulation (1) of Regulation 36A of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)*

| RELEVANT PARTICULARS | | |
|---|---|---|
| 1. | Name of the corporate debtor along with PAN & CIN / LLP No. | **V.G.I Pharma Private Limited**<br>PAN: AADCV6940J<br>CIN: U24200MH2011PTC218263 |
| 2. | Address of the registered office<br>*(as per MCA records)* | Plot no. J-8, Phase 3, MIDC Akola, Maharashtra – 444104. |
| 3. | URL of website | NA |
| 4. | Details of place where majority of fixed assets are located | Plot no. J-8, Phase 3, MIDC Akola, Maharashtra – 444104. |
| 5. | Installed capacity of main products / services | Not Available since the Company is not in operations since 2021. |
| 6. | Quantity and value of main products / services sold in last financial year | As per information available, Company is not in operations since 2021. |
| 7. | Number of employees / workmen | Nil as per the information available. |
| 8. | Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors are available at URL: | The details as available can be sought by sending an email on vgipharma.ibc@gmail.com and / or Virtual Data Room in accordance with the provisions of the Code and Regulations made thereunder. |
| 9. | Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at URL: | The detailed invitation for expression of interest which shall include the eligibility for resolution applicants under Sec 25(2)(h) of the Code can be sought by sending an email on vgipharma.ibc@gmail.com |
| 10. | Last date for receipt of expression of interest | August 12, 2025 |
| 11. | Date of issue of provisional list of prospective resolution applicants | August 15, 2025 |
| 12. | Last date for submission of objections to provisional list | August 20, 2025 |
| 13. | Date of issue of final list of prospective resolution applicants | August 23, 2025 |
| 14. | Date of issue of information memorandum, evaluation matrix and request for resolution plans to prospective resolution applicants | August 26, 2025 |
| 15. | Last date for submission of resolution plans | September 25, 2025 |
| 16. | Process email id to submit EOI | vgipharma.ibc@gmail.com |
| 17. | Details of the corporate debtor's registration status as MSME | Details not available. |

*Important Notes:*

1. *This Form G is being published pursuant to the original Form G published on January 31, 2025 and thereafter second Form G published on May 15, 2025 and addendum to second Form G published on June 25, 2025 and with consent of the COC. Existing applicants pursuant to previous Form G are not required to submit Fresh EOI.*
2. *This Form G and the timelines/terms mentioned herein are subject to approval of extension of tenure of Corporate Insolvency Resolution Process of the Corporate Debtor.*




**Kshitiz Gupta**
Registration Number: IBBI/IPA-002/IP-N00721/2018-2019/12140
AFA Valid Till: December 31, 2025
**Resolution Professional of V.G.I. Pharma Private Limited**

**<u>Address & email id registered with IBBI:</u>**
F-52, First Floor, Centrium Mall, Lokhandwala Township Akurli Road,
Kandivali East, Mumbai - 400101

Email Address- kshitiz.ca@gmail.com

<u>Process specific email id for correspondence:</u> vgipharma.ibc@gmail.com

**Date: July 28, 2025**
**Place: Mumbai**

# बैठे काम करणाऱ्यांसाठी व्यायाम आवश्यक

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** करोना महामारीनंतर अनेक आस्थापनांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी घरून काम करण्याचा (वर्क फ्रॉम होम) पर्याय दिला. अद्यापही अनेक आस्थापनांचे कर्मचारी घरून काम करत आहेत. यासाठी त्यांनी बसण्याची खास व्यवस्था केली आहे. कोणी बसून काम करण्यासाठी, तर कोणी उभे राहून काम करण्यासाठी त्याप्रमाणे बाकडे तयार केले आहेत. आपल्या शरीराला आरामदायी वाटेल, असा पर्याय लोक निवडतात. परंतु, घरून काम करण्यामुळे अनेकांच्या हालचालींवर मर्यादा आल्याने त्याच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत बोलले जात आहे. बसून काम करावे की, उभे राहून करावे यावर अनेकजण आपापली मते मांडतात.

यावर आरोग्यतज्ज्ञ सांगतात की, "दीर्घकाळ बसण्याच्या जागी उभ्या असलेल्या बाकड्यामुळे इन्सुलिनच्या संवेदनशीलतेचा फायदा होतो आणि ग्लुकोज चयापचय, विशेषतः 'टाइप २' मधुमेहाचा धोका असलेल्या व्यक्तींमध्ये उभे राहून किंवा हलकी हालचाल करून बसण्याची वेळ कमी होण्यास मदत होते. यामुळे जेवणानंतर रक्तातील ग्लुकोज वाढते आणि एकूणच चयापचय सुधारते."

कामाच्या दिवसात उठ-बस करणे, काही हालचाली करत राहणे, हे इंसुलिनच्या प्रतिकारामध्ये माफक सुधारणा घडवून आणतात. हालचाली करण्याचा हा उपाय साधा वाटत असला तरी प्रत्येक तासाच्या काही भागासाठी ऊठ-बस अथवा हालचाली केल्यास कालांतराने मोजता येण्याजोगा फरक पडू शकतो, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधतात. हलका व्यायाम तसेच काम करतानाची बसण्याची ६० ते ९० मिनिटांनी कमी केल्यास याचे खूप चांगले परिणाम दिसू शकतात, असे तज्ज्ञ सुचवितात.

# नियुक्तीचे निकष पदोन्नतीला लागू

## अंगणवाडी सेविकांबाबत उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नागपूर :** अंगणवाडी सेविकांच्या निवड प्रक्रियेबाबत राज्य शासनाने ऑगस्ट २०१४ रोजी परिपत्रक काढले होते. यात निवड प्रक्रियेसह तक्रारीचे नियम स्पष्ट करण्यात आले आहे. नियुक्तीसंबंधीचे हे निकष अंगणवाडी सेविकांच्या पदोन्नतीच्या प्रक्रियेसाठी लागू राहतील, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध्ये आणि न्या. नितीन सांबरे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

अमरावतीमध्ये याचिकाकर्ता वर्षा तायडे या अंगणवाडी मदतनीस म्हणून कार्यरत होत्या. याचिकेनुसार, अनुभवी असल्याने त्या अंगणवाडी सेविका म्हणून पदोन्नतीस पात्र होत्या. मात्र, महिला व बालकल्याण विभागाने कमी अनुभवी वैभवी गावंडे यांना पदोन्नती दिली. या निर्णयाविरोधात तायडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. राज्य शासनाने अंगणवाडी सेविकांच्या नियुक्तीबाबत १३ ऑगस्ट २०१४ रोजी परिपत्रक काढून धोरण स्पष्ट केले होते. या परिपत्रकातील कलम ६-अ नुसार निवड प्रकियेबाबत काही आक्षेप असल्यास विभागीय आयुक्तांकडे तक्रार करण्याची मुभा आहे. परंतु, या परिपत्रकातील नियम व निकष केवळ नियुक्तीसाठी लागू होत असल्याचा दावा उच्च न्यायालयात करण्यात आला. उच्च न्यायालयाने हा दावा फेटाळत संबंधित परिपत्रक नियुक्तीसह पदोन्नती प्रक्रियेत लागू होत असल्याचा निर्वाळा दिला.

उच्च न्यायालयाने याप्रकरणात याचिकाकर्त्यांना विभागीय आयुक्तांसमोर तक्रार नोंदवण्याचे निर्देश दिले. तसेच यावर सहा आठवड्यात निर्णय घेण्याच्या सूचनाही न्यायालयाने विभागीय आयुक्तांना दिल्या. हा निर्णय देत न्यायालयाने याचिका निकाली काढली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. एस. चिखले यांनी तर राज्य शासनाच्यावतीने ॲड. एन. एस. राव यांनी युक्तिवाद केला.

# सफाई कामगारांना नियमित करण्याची मागणी

## उच्च न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्य शासनाने २०२३ मध्ये महापालिकेसाठी नवीन रचनेला मंजुरी दिली. या रचनेच्या अंमलबजावणीदरम्यान, सुमारे चार हजार ४७० सफाई कामगारांची नवी पदे निर्माण करण्यात आली. यामुळे महापालिकेत आठ हजारांहून अधिक स्वच्छता कामगारांची कायमस्वरूपी पदे तयार झाली. दरम्यान सफाई कामगारांना नियमित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अधिसंख्य सफाई कामगारांना नियमित पदांवर समाविष्ट करण्यात यावे, असे शासकीय परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, हा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. यावर कार्यवाही करण्याचे आदेश महापालिकेला देण्याची मागणी करत नागपूर महापालिका ऐवजदार कामगार संघटनेचे अध्यक्ष जम्मू आनंद यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

याचिका दाखल झाल्याने उच्च न्यायालयाने या प्रकरणात राज्य शासनाच्या नगरविकास विभागाला आणि महापालिकेच्या आयुक्तांना नोटीस बजावली. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. राहुल भानारकर यांनी युक्तिवाद केला.


## शांत झोपेसाठी..मी रोज रात्री घेते

100% Ayurvedic FDA APPROVED



तन्वीशता टॅबलेट

Tanvi HERBALS TANVISHATAA

केमिस्टकडे उपलब्ध

तन्वी क्लिनिक ठाणे रोज 11 ते 1 फ्री चेकअप व फोनवर कन्सल्टेशन 9820075813


## महिलेची १६ लाख ६० हजारांनी फसवणूक

**नागपूर :** महिलेच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा उचलत एका माय-लेकाने गरजू महिलेचा विश्वासघात करून तिचे घरच लुबाडले नाही तर तिची १६ लाख ६० हजारांनी फसवणूक केल्याचा प्रकार शनिवारी उघडकीस आला. जुलै २०२३ मध्ये फसवणुकीनंतरही या ठगबाज माय-लेकाने महिलेला दोन वर्षे झुलवत ठेवले. पीडित महिलेला बँका कर्ज देण्यास तयार नव्हत्या. याबाबत त्यांच्या मुलाने इंटरनेटवर शोध घेतला. त्याला वर्षा भेंडे या महिलेचा नंबर मिळाला. त्यावर फोन करीत त्यांनी मदत मागितली असता वर्षा भेंडे आणि तिचा मुलगा सारंग भेंडे या दोघांनी कर्ज मिळवून देण्याची हमी दिली. त्यानंतर त्यांना खोटे सांगत त्यांच्या घराची परस्पर राजेंद्र विठोबा दियेवार यांच्या नावाने घर खरेदीची दस्त नोंदणी करून घेतली. दरम्यान, पीडितेच्या खात्यात १८ लाख ५० हजार रुपये वळते करण्यात आले.

## घराभोवती वीज प्रवाह; महिलेचा मृत्यू

**यवतमाळ :** गावगाड्याच्या राजकारणात संपूर्ण कुटुंबालाच विजेच्या धक्क्याने ठार करण्याचा कट रचण्यात आला. या घटनेत सविता मनेश पवार (३७) हिचा मृत्यू झाला तर तिचा पती मनेश बचावला. ही घटना आर्णी तालुक्यातील अंजी नाईक येथे शनिवारी घडली. आम्हाला ठार मारण्यासाठी प्रयत्न केल्याचा आरोप पवार कुटुंबीयांनी केला. याप्रकरणी इंदल राठोड (४७), सुदाम चव्हाण (६५), गणेश राठोड (५९), विनोद चव्हाण (४८), राजू जाधव (३५), चेतन चव्हाण (२८) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# संपत्तीच्या वादावरून लैंगिक छळाचा आरोप


**नागपूर :** दोन कुटुंबीयांमध्ये संपत्तीच्या वाद सुरू असतानाच दहा वर्षीय मुलीचा लैंगिक छळ केल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली. या प्रकरणात पोलिसांनी ४७ वर्षीय आरोपीला अटक केली होती. आरोपीने जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली. न्यायालयाने संपत्तीवरून कौटुंबिक वादाची पार्श्वभूमी लक्षात घेता आरोपीला जामीन मंजूर केला.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीनुसार, १६ एप्रिल २०२५ रोजी ४७ वर्षीय आरोपीने तिच्या मुलीला अयोग्यरित्या स्पर्श करून विनयभंग केल्याचा आरोप होता. दोन्ही पक्षांकडून युक्तिवाद ऐकल्यावर न्यायालयाने अटींसह जामीन अर्ज मंजूर केला. खटला संपेपर्यंत सक्करदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रवेश करू नये, प्रत्येक सुनावणीत हजर राहावे, या अटींवर आरोपीला नियमित जामीन दिला. आरोपीर्ते ॲड. मकरंद आचार्य यांनी बाजू मांडली.


लोकसत्ता क्लासिफाइड्स् सगळ्यांकरिता सर्वकाही

DR. G. D. POL FOUNDATION'S
INSTITUTE OF NURSING EDUCATION
Institutional Area, Sec - 04, Kharghar, Navi Mumbai 410210.
RECOGNIZED BY
Indian Nursing Council, State Govt. of Maharashtra, MUHS-Nashik, Maharashtra State Board of Nursing & Paramedical Education, Maharashtra Nursing Council.

ADMISSION OPEN FOR
P.B B.Sc
Upto 30/09/2025



ELIGIBILITY CRITERIA
General Nursing & Midwifery Diploma Should be completed
By Order
CHAIRMAN

9967771768 / 8108166699
ymtnursing@gmai.com | www.ymtnursing.org
Sector - 4, International Area, Kharghar, Navi Mumbai 410210.

**मॅरेज ब्युरो**

सुप्रसिद्ध सौ. कुळकर्णी विवाहसंस्थेत नाव नोंदवा. सर्व जातींची उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. ४२ वर्षांची परंपरा, लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव. मॉन्सून ऑफर्ससाठी 9892625606/ 8369692734.

0070934850-14

**मालमत्तासंबंधी**

Platinum-9 World Tower, Wakad, Pune's Tallest Commercial, Iconic Award Winning Project & India's 1st 3 Level 360° Revolving Restaurant, Dream Investment in Premium Showrooms, Retail Shops, Food Court, Smart Corporate Offices & Multipurpose Spaces 15Ft. Height, Your Legacy Starts Here- Once in a Lifetime Opportunity. Contact- 7205970999.

0090379661-1

**प्लॉट विक्रीविषयक**

प्लॉट विक्रीविषयक- ऑफरमध्ये ईगतपुरी कर्जत लोणावळा परिसरात पाचगणी पानशेतलेक अलिबाग माणगाव दिवेअगार दापोली-बीच नवीमुंबई पुणे पुरंदर विमानतळा जवळ फायद्याच्या सौद्यात प्लॉट बागायघर भक्तनिवासघर बुकिंगसाठी - 9699505226/ 8605441821

0070979479-1


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाईजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology, Pune

**Admission Notification for First Year B Tech for AY 25-26**

Applications are invited from all eligible candidates for admission to various First Year B Tech programs under the Institute Quota including NRI and / or probable seats remaining vacant after all CAP round(s) due to non-reporting and / or cancellations of seats, as the case may be.

Eligibility of the candidates and admission process will be as per rules and regulations by State CET cell, Govt. of Maharashtra & other competent authorities if any.

Detailed process and schedule for round(s) will be published on Institute's website www.vit.edu and / or notice board from time to time.

Date : 28.07.2025 Sd/-
Place : Pune - 411037 Director


प्रपत्र जी
स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रण

**'व्ही.जी.आय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड'**

अकोला, महाराष्ट्र येथे औषध उत्पादन क्षेत्रात कार्यरत
[भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ
(कॉर्पोरेट व्यक्तींना नादार ठरविण्याची प्रक्रिया) नियम, 2016 मधील नियम 36ए मधील उप-नियम (1) अंतर्गत]

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| 1. | कॉर्पोरेट देणेकरयाचे नाव तसेच PAN/ CIN / LLP क्र. | **व्ही.जी.आय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड PAN:AADCV6940J CIN: U24200MH2011PTC218263** |
| 2. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | प्लॉट क्र. जे-8, फेज 3, एमआयडीसी अकोला, महाराष्ट्र-444104. |
| 3. | वेबसाईटचा यूआरएल | उपलब्ध नाही |
| 4. | बहुतेक स्थिर मत्ता जेथे स्थित आहेत त्या ठिकाणांचे तपशील | प्लॉट क्र. जे-8, फेज 3, एमआयडीसी अकोला, महाराष्ट्र-444104. |
| 5. | मुख्य उत्पादने/ सेवांची क्षमता | उपलब्ध माहितीनुसार कंपनी 2021 पासून कार्यरत नाही. |
| 6. | मागील आर्थिक वर्षात विक्री करण्यात आलेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे प्रमाण व मूल्य | उपलब्ध माहितीनुसार कंपनी 2021 पासून कार्यरत नाही. |
| 7. | कर्मचारी / कामगारांची संख्या | उपलब्ध माहितीनुसार निरंक. |
| 8. | दोन वर्षांची शेवटची उपलब्ध असलेली वित्तीय विवरणे (वेळापत्रकासह), घेणेकरयांच्या याद्या, पुढील प्रक्रियांसाठी संबंधित दिनांकांसह अधिक तपशील येथे उपलब्ध आहे | **vgipharma.ibc@gmail.com** येथे ईमेल पाठवून उपलब्ध तपशील प्राप्त करता येईल आणि / किंवा संहिता आणि / किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमधील तरतुदींच्या अनुषंगाने व्हर्च्युअल डेटा रूम. |
| 9. | संहितेच्या अनुच्छेद 25(2)(एच) अंतर्गत ठराव अर्जदारांसाठी अर्हता येथे उपलब्ध आहेतः | vgipharma.ibc@gmail.com येथे विनंती पाठवून संहितेच्या अनु. 25(2)(एच) अंतर्गत ठराव अर्जदारांसाठी अर्हता असलेले स्वारस्य अभिव्यक्तीसाठी तपशीलवार आमंत्रण मागविता येईल |
| 10. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक : | **12 ऑगस्ट, 2025** |
| 11. | संभाव्य ठराव अर्जदारांसाठी हंगामी यादी जारी करण्याचा शेवटचा दिनांक | **15 ऑगस्ट, 2025** |
| 12. | हंगामी यादीवरील आक्षेप सादर करण्याचा सादर करण्याचा शेवटचा दिनांक | **20 ऑगस्ट, 2025** |
| 13. | संभाव्य निराकरण अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याचा दिनांक | **23 ऑगस्ट, 2025** |
| 14. | संभाव्य निराकरण अर्जदारांना माहिती निवेदन, मूल्यांकन सारणी आणि विनंती जारी करण्याचा दिनांक | **26 ऑगस्ट, 2025** |
| 15. | निराकरण योजना सादर करण्याचा शेवटचा दिनांक | **25 सप्टेंबर, 2025** |
| 16. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | **vgipharma.ibc@gmail.com** |
| 17. | एमएसएमई म्हणून कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीच्या स्थितीचे तपशील | तपशील उपलब्ध नाही. |

**महत्त्वाच्या टीपा:**

1. हे प्रपत्र जी 31 जानेवारी, 2025 रोजी प्रकाशित झालेल्या मूळ प्रपत्र जी आणि 15 मे, 2025 रोजी प्रकाशित झालेल्या दुसरया प्रपत्र जी आणि 25 जून, 2025 रोजी प्रकाशित झालेल्या दुसरया प्रपत्र जी चे जोडपत्र म्हणून आणि सीओसी च्या मंजुरीने प्रकाशित करण्यात येत आहे. यापूर्वीच्या प्रपत्र जी च्या अनुषंगाने विद्यमान अर्जदारांना नव्याने स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याची आवश्यकता नाही.
2. हे प्रपत्र जी आणि आणि येथे नमूद वेळापत्रक / अटी माननीय एनसीएलटी द्वारे कॉर्पोरेट कर्जदाराच्या कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रियेचा कालावधी वाढविण्यास मंजुरीच्या अधीन आहेत.

स्वा/-
**क्षितीझ गुप्ता**
**नोंदणी क्रमांकः**
**दिनांकः 28 जुलै, 2025**
**स्थानः मुंबई**
**IBBI/IPA-002/IP-N00721/2018-2019/12140,**
**आअवैधता दिनांकः 31 डिसेंबर, 2025**
**व्ही.जी.आय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड चे निराकरण व्यावसायिक**
**आयबीबीआय कडे नोंदणीकृत पत्ता आणि ईमेल आयडीः एफ-52, पहिला मजला, सेंट्रीयम मॉल, लोखंडवाला टाऊनशिप आकुर्ली रोड, कांदिवली पूर्व, मुंबई- 400101**
**ईमेल ॲड्रेस –kshitiz.ca@gmail.com**
**पत्रव्यवहारासाठी प्रक्रिया-विशिष्ट ईमेल आयडीः vgipharma.ibc@gmail.com**

# पाश्चिमात्य देशांची भारताला युद्धात फसवायची इच्छा



## ले.ज. विनोद खंडारे (निवृत्त) यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** भारत हा विकसनशील देश आहे. देशाची आर्थिक प्रगती थांबवण्यासाठी पाश्चिमात्य देश भारताला युद्धाच्या जाळ्यात फसवायची इच्छा ठेवतात. शेजारचे देशही आपल्याला युद्धात फसवण्याच्या तयारीत असतात, मात्र, आपल्याला पुढे जावे लागेल आणि याच कारणामुळे अलीकडची लढाई चार दिवसात आटोपली, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाचे माजी मुख्य सल्लागार लेफ्टिनंट जनरल विनोद खंडारे (निवृत्त) यांनी दिली.

'जनमंच'च्यावतीने जनसंवाद कार्यक्रमाच्या अंतर्गत रविवारी 'जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात भारत किती सुरक्षित?' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. शंकरनगर चौकातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित कार्यक्रमात ले.ज. विनोद खंडारे (निवृत्त) यांनी विविध पैलू उलगडले. प्रा. शरद पाटील यांनी त्यांच्याशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे उपस्थित होते.

'पाकिस्तान आणि चीन एकत्रित आले आहे. एकाच वेळी दोघांनीही हल्ला केल्यास एकाला 'होल्ड' करून दुसऱ्यावर प्रहार करण्याची सैन्याची नीती असते. मात्र, ही लढाई केवळ सैन्याची नाही. ही लढाई आर्थिक आणि राजकीय स्तरावर देखील आहे. चीनसोबत आपल्याला कधी लढायचे याचा निर्णय आपण घेऊ. देशाची आर्थिक प्रगती थांबवण्यासाठी युद्धात फसवायची पाश्चिमात्य देशांची इच्छा आहे', असे खंडारे यांनी सांगितले. आज लढाई दोन देशांमध्ये नसतेच. अलीकडेच चीन आणि तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिला कारण त्यांना युद्धसामग्री विकायचे आहे. भारत स्वतः युद्ध सामग्री तयार करतो, त्यामुळे युद्ध सामग्री तयार करणारे देश भारताला पाठिंबा देण्याचा प्रश्नच नाही, असेही ते म्हणाले.

तिसरे विश्वयुद्ध हे दुसऱ्या प्रकारे लढले जाणार आहे. यात सायबर युद्ध, पर्यावरणीय युद्ध, आर्थिक युद्ध तसेच अंतराळ युद्ध यांचा समावेश राहू शकतो, असे खंडारे यांनी सांगितले. भारत नागरी सुरक्षेसाठी तयार नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक जनमंचचे अध्यक्ष राजीव जगताप यांनी केले.

### 'सैन्याला ट्रम्पचा फोन येत नाही'

ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्याने जे उद्दिष्ट ठरवले होते, ते यशस्वीपणे पूर्ण केले. या कारवाईच्या माध्यमातून भारत पीओके वगळता इतर हल्ला करू शकत नाही हा पाकिस्तानचा गैरसमज दूर केला. पाकिस्तान विश्वासार्ह नाही त्यामुळे प्रतिहल्लाबाबत भारतीय सैन्याकडे पूर्वीपासूनच नियोजन होते, अशी माहिती खंडारे यांनी दिली. युद्ध थांबवण्यात ट्रम्पने मध्यस्थी केली काय या प्रश्नावर त्यांनी सांगितले की ट्रम्पचा सैन्याला थेट फोन येत नाही आणि आम्ही ट्रम्पला विचारून लढाईची तयारी करत नाही.

### अभिव्यक्तीची सुरक्षा होत नाही, देशाची कशी होणार?

सध्या युद्धाचे स्वरूप बदलत आहे. इस्राईलच्या पेगॅससच्या माध्यमातून जासूसी करण्याचा प्रयत्न झाला. देशात अभिव्यक्तीची सुरक्षा होऊ शकत नाही तर मग देशाची सुरक्षा कशी होणार, असा सवाल ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे यांनी उपस्थित केला. देशात राफेल, बोफोर्सची तोफ धडाडत नाही, मात्र यांच्या करारांची तोफ धडकत आहे, असेही दुबे म्हणाले.




TATA
**TATA STEEL LIMITED**

**Registered Office:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai-400001, India
**Tel.:** +91 22 6665 8282, **Email:** cosec@tatasteel.com, **Website:** www.tatasteel.com
**Corporate Identification Number:** L27100MH1907PLC000260

## भागधारकांना सूचना

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने त्यांच्या २ जुलै, २०२५ दिनांकित सर्क्युलर क्र. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97, द्वारे १ एप्रिल, २०१९ च्या अंतिम मुदतीपूर्वी सादर केलेल्या आणि दस्तावेजांमधील त्रुटीमुळे फेटाळण्यात आलेल्या/परत केलेल्या प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेल्या शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा सादर करता याव्यात यासाठी विशेष कक्ष उघडण्याची अनुमती दिली आहे. म्हणून, ज्या गुंतवणूकदारांची पुनर-सादरीकरणासाठी आधीची ३१ मार्च, २०२१ ही अंतिम मुदत हुकली त्यांनी कृपया खालील तपशिलांचा अवलंब करून कंपनीच्या रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंटकडे आवश्यक दस्तावेज सादर करावेत:

| महत्त्वाचे तपशील | |
|---|---|
| पुनर-सादरीकरणासाठी कक्ष | **७ जुलै, २०२५ ते ६ जानेवारी, २०२६** |
| कोण हस्तांतरण विनंत्या पुन्हा सादर करू शकतात? | १ एप्रिल, २०१९ पूर्वी ज्यांचे हस्तांतरण विलेख सादर केले होते आणि दस्तावेजातील त्रुटीमुळे फेटाळले/परत केले होते ते गुंतवणुकदार |
| हस्तांतरण विनंत्या कशा पुन्हा सादर करायच्या? | दुरुस्त केलेले किंवा वेगळलेल्या तपशिलांसह आवश्यक मूळ हस्तांतरण दस्तावेज रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंट, एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) कडे सादर करावेत. |

| | |
|---|---|
| टपाल पत्ता | एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड<br>युनिट: टाटा स्टील लिमिटेड<br>सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३ |
| हेल्पलाईन क्र. | + ९१ ८१०८१ १८४८४ |
| कोणत्याही चौकशीसाठी | येथे एक सेवा विनंती करावी:<br>https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html<br>किंवा cosec@tatasteel.com येथे एक ई-मेल पाठवावा |

हस्तांतरणासाठी पुन्हा सादर केलेले शेअर्स फक्त डिमॅट स्वरूपात जारी केले जातील.

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**पार्वथीसम कांचिनाधम**
कंपनी सेक्रेटरी अँड चिफ लिगल ऑफिसर
एसीएस: १५९२१

२५ जुलै, २०२५
मुंबई

TATA STEEL